**ठळक बातम्या**

- महिला आरक्षण विधेयकावर लोकसभेत चर्चा सुरु /महिलांना निर्णय प्रक्रियेत सामावून घेणं आवश्यक असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- महिला आरक्षण विधेयकाला मतदारसंघ पुनर्रचनेशी जोडायला विरोधी पक्षांचा विरोध

- महाराष्ट्र विधान परिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर/ १२ मे रोजी मतदान

- भारत आणि ऑस्ट्रीया यांच्यात विविध क्षेत्रातले समझोता करार

**आणि**

- इराणचे अण्वस्त्र प्रकल्प थांबवण्याच्या इस्रायल आणि अमेरिकेच्या भूमिकेला इराणचा ठाम नकार

**<><><><><>**

महिला आरक्षण विषयक विधेयकासाठी संसदेच्या विस्तारित अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तीन दिवसीय विशेष सत्राला आज प्रारंभ झाला. सभागृहात अबू हासेम खान चौधरी, मोहसिना किडवाई आणि हरी नारायण राजभर तसंच दिवंगत गायिका आशा भोसले यांना आदरांजली वाहण्यात आली आणि त्यानंतर कामकाजाला सुरुवात झाली.

केंद्रशासित प्रदेश’ (सुधारणा) विधेयक २०२६, संविधानाची १३१वी दुरुस्ती विधेयक तसंच, मतदारसंघ पुनर्रचना विधेयक लोकसभेत मांडण्यात आलं. या विधेयकांवरल्या चर्चेला, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुरूवात केली. नारी शक्ती वंदन विधेयकावरल्या चर्चेत बोलताना, लोकसंख्येचा अर्धा भाग असणाऱ्या महिलांना निर्णय प्रक्रियेत सामावून घेणं आवश्यक असून महिला, देशाच्या

विकासात महत्त्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याला राजकीय रंग देऊ नये, असं आवाहन करत हे विधेयक लोकशाहीच्या हिताचं आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

मतदारसंघ पुनर्रचना विधेयकामुळे कुठल्याही राज्याच्या बाबतीत भेदभाव होणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

**होल्ड बाईट मोदी**

समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यानी महिला आरक्षणाला, आपल्या पक्षाचा पाठिंबा असल्याचं सभागृहात बोलताना स्पष्ट केलं. मात्र महिला आरक्षण विधेयक, २०२७ ची जनगणना झाल्यावरच सादर केलं जावं असं ते म्हणाले. तेलगू देसम पक्षाच्या डॉ बायरेड्डी शबरी यांनी नारी शक्ती वंदन विधेयकाचं स्वागत केलं. त्याआधी केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी संविधानाची १३१वी दुरुस्ती विधेयक आणि मतदारसंघ पुनर्रचना विधेयक लोकसभेत सादर केलं. देशभरात महिलांना राखीव जागा देण्यासाठी लोकसभा मतदारसंघात ५० टक्के वाढ करणं गरजेचं आहे, त्यामुळे लोकसभेचे ८१५ मतदारसंघ तयार केले जातील असं मेघवाल यांनी सांगितलं. यातल्या २७२ जागा महिलांसाठी राखीव असतील. २०२७ ची जनगणना पूर्ण व्हायला वेळ लागेल त्यामुळे मतदारसंघाची पुनर्रचना करण्यासाठी तसंच अनुसूचित जाती आणि जमातीसाठी राखीव जागा ठेवण्यासाठी २०११ च्याच जनगणनेचा आधार घेतला जाईल हेही त्यांनी स्पष्ट केलं.

काँग्रेसचे लोकसभेतले उपनेते गौरव गोगोई यांनीही महिला आरक्षणाला पाठिंबा दर्शवला. मात्र महिला आरक्षणाला मतदार संघ पुनर्रचनेशी जोडू नये असं ते म्हणाले. लोकसभेच्या आताच्या ५४३ जागांसाठीच महिला आरक्षण लागू करावं अशी मागणी त्यांनी केली.

**<><><><><>**

केंद्र सरकारने लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारा २०२३चा कायदा त्वरित लागू करावा आणि मतदारसंघ पुनर्रचनेची प्रक्रिया स्थगित करावी, अशी मागणी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे.

<><><><><>

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ९ जागांसाठी १२ मे रोजी मतदान होणार आहे. भारत निवडणूक आयोगानं आज विधानपरिषदेसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठीचा कार्यक्रम जाहीर केला. त्यानुसार या निवडणुकीसाठी २३ ते ३० एप्रिल या कालावधीत उमेदवारी अर्ज भरता येतील. २ मे ला अर्जांची छाननी होईल, ४ मे पर्यंत अर्ज मागे घेता येतील. आणि १२ मे ला सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होईल. विधानपरिषदेचे हे ९ सदस्य महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्यांकडून निवडले जाणार आहेत.

येत्या १३ मे ला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, विधानपरिषद उपसभापती नीलम गोऱ्हे, शशिकांत शिंदे, संजय केनेकर, संदीप जोशी, दादाराव केचे, अमोल मिटकरी, राजेश राठोड आणि रणजीतसिंह मोहिते हे सदस्य निवृत्त होत आहेत.

<><><><><>

विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी हे स्वप्न तरुण विद्यार्थ्यांनी पाहणं आवश्यक आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. वर्धा जिल्ह्यातल्या सेवाग्राम इथं महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाच्या, ६व्या दीक्षांत समारंभात त्या बोलत होत्या....

**बाईट .. राष्ट्रपती**

गुणवंत विद्यार्थ्यांना राष्ट्रपतींच्या हस्ते सुवर्णपदकं प्रदान करण्यात आली तर, एकूण आठ विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रमांत उत्कृष्ट कामगिरीबद्दल सन्मानित करण्यात आलं.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वर्ध्याचे पालकमंत्री पंकज भोयर आणि इतर मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज महात्मा गांधींच्या सेवाग्राम आश्रमाला भेट दिली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज ऑस्ट्रीयाचे चॅन्सेलर डॉ क्रिस्तियन स्टॉकर यांच्याशी प्रतिनिधी मंडळ स्तरावर चर्चा केली. यावेळी उभय देशांमधे विविध क्षेत्रातल्या समझोता करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. लष्करी सहकार्य, खाद्यसुरक्षा यासारख्या क्षेत्रात हे करार झाले. स्टॉकर यांच्या भेटीमुळे गुंतवणूक आणि व्यापार क्षेत्रात भारत ऑस्ट्रीया संबंधांना नवी ऊर्जा मिळेल, असं प्रधानमंत्री मोदी यांनी नंतर संयुक्त निवेदनात सांगितलं. सध्याच्या तणावपूर्ण वातावरणात, लष्करी संघर्षाऐवजी शांततेचा पर्याय निवडण्यावर दोन्ही राष्ट्रांची सहमती झाल्याचं मोदी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

इराणकडून अण्वस्त्रं निर्मिती सामग्री काढून घेणं आणि त्यांचे अण्वस्त्र प्रकल्प थांबवणं हेच इस्त्रायल आणि अमेरिकेचं समान उद्दिष्ट आहे, असं इस्त्रायलचे प्रधानमंत्री बिन्यामीन नेतन्याहू यांनी स्पष्ट केलं. इराणसोबत सुरू असलेल्या वाटाघाटींची माहिती अमेरिका आपल्याला देत आहे, असंही नेतन्याहू यांनी सांगितलं. अमेरिकेच्या मध्यस्थीनं लेबननसोबतही वाटाघाटी सुरू असल्याचं नेतन्याहू यांनी सांगितलं. दुसरीकडे आपल्या अणुशक्ती संवर्धन करण्याच्या अधिकारांबाबत इराण कोणतीही तडजोड करणार नाही असं इराणचे परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ता इस्माईल बकई यांनी तेहरानमधे वार्ताहर परिषदेत सांगितलं. आंतरराष्ट्रीय कायद्यानुसारच इराण अणुसंवर्धन कार्यक्रम राबवत आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

२०२७ च्या जनगणनेअंतर्गत पहिल्या टप्प्यातल्या गृहगणनेला आजपासून प्रत्यक्ष सुरुवात झाली. अंदमान - निकोबार, गोवा, कर्नाटक, लक्षद्वीप, मिझोराम, ओडिशा आणि सिक्कीम या राज्यांमध्ये तसंच नवी दिल्ली महानगरपालिका आणि दिल्ली कटक मंडळ या भागात महिनाभर ही मोहीम राबवली जाईल. या काळात प्रगणक घरोघरी जाऊन माहिती संकलित करतील.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमध्ये निवडणूक आयोगानं केलेल्या एक हजाराहून अधिक प्रशासकीय आणि पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्यांना आव्हान देणारी याचिका आज सर्वोच्च न्यायालयानं फेटाळून लावली. तसंच राज्य सरकार आणि निवडणूक आयोग यांच्यात विश्वासाचा अभाव असल्याबद्दल न्यायालयानं खेद व्यक्त केला.

**<><><><><>**

आंध्रप्रदेशातल्या कुरनूल जिल्ह्यात आज झालेल्या रस्ते अपघातात आठ जणांचा मृत्यू झाला, तर दहा जण जखमी झाले. जखमींवर कुरनूलच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात सामना सुरु आहे. पंजाब किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हा मुंबई इंडियन्सच्या ७ षटकात २ बाद ६७ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**